## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८

### जाहिरात प्रकटन – नोव्हेंबर २०१७

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या** आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत शासन मान्यतेनुसार **विद्यावेतनावर** विहित प्रशिक्षण कालावधी करीता शिकाऊ उमेदवारांच्या नेमणुका करावयाच्या आहेत. त्याकरिता खालील व्यवसायाचे उमेदवारांकडुन नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार खालील पदाचे संख्येनुसार शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करण्यास अर्हताधारक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | व्यवसायाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणिक व तांत्रिक पात्रता | प्रशिक्षण कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पॅथॉलॉजी | ०९ | १२ वी शास्त्र ( फिजिक्स, केमिस्ट्रि, बायोलॉजी विषय उत्तीर्ण होणे आवश्यक) | ६ महिने |
| २ | रेडीऑलॉजी | ०३ | १२ वी शास्त्र ( फिजिक्स, केमिस्ट्रि, बायोलॉजी विषय उत्तीर्ण होणे आवश्यक) | ६ महिने |
| ३ | कार्डीऑलॉजी | ०२ | १२ वी शास्त्र ( फिजिक्स, केमिस्ट्रि, बायोलॉजी विषय उत्तीर्ण होणे आवश्यक) | ६ महिने |
| ४ | गार्डनर (माळी) | १५ | १० वी उत्तीर्ण असावे. | १ वर्ष |
| | एकूण | २९ | | |

<u>अटी व शर्ती –</u>

१) **मा.सहा.आयुक्त,प्रशासन** पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी–४११०१८. यांच्या नावे अर्ज समक्ष/पोष्टाने महापालिकेच्या प्रशासन विभागामध्ये सादर करावा.

२) अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी Web site :- www.apprenticeship.gov.in (DGET MIS PORTAL) Use Mozilla Firefox or Google Chrome Browser Only यावर रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे.

३) **शासकीय ITI** प्रशिक्षण, पॅथॉलॉजी, रेडीऑलॉजी, कार्डीऑलॉजी, व गार्डनर याकरिता शैक्षणिक उत्तिर्ण वर्ष २०१५ ते २०१७ मधिल असणे आवश्यक आहे.

४) उमेदवाराने अर्जासोबत वयाचे पुराव्यार्थ शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेच्या पुराव्यार्थ अंतिम गुणपत्रिका व मागासवर्गीय प्रवर्गातील असल्यास सक्षम अधिका-याने दिलेला जातीचा दाखला इतर कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. छायांकीत प्रतीवर स्वत:ची स्वाक्षरीने करू नयेत.

५) आधारकार्ड आवश्यक आहे.

६) उमेदवारांनी त्यांचे अर्ज दि. ३०/११/२०१७ पर्यंत समक्ष अथवा पोस्टातून प्रशासनास प्राप्त होतील याची खबरदारी घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज ई-मेलद्वारे पाठवू नयेत. टपाल खात्यामुळे झालेल्या कोणत्याही विलंबास अथवा टपाल गहाळ झाल्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

७) उमेदवार संख्येनुसार आरक्षण विचारात घेऊन उमेदवाराने ज्या राखीव जातीच्या प्रवर्गातील जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर केले आहे त्यानुसार आरक्षण व गुणानुक्रम याप्रमाणे शिकाऊ उमेदवारांच्या रिक्त जागांवर नेमणुका केल्या जातील.

८) **मा.आयुक्त सो.**यांनी शिकाऊ उमेदवारांच्या नेमणुकांचे अंतिम अधिकार राखुन ठेवले आहेत.

९) **<u>उमेदवार निवडीची पद्धत –</u>** मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक केंद्र, टेल्कोरोड, पुणे-१९, यांचे आदेश/सूचना यानुसार उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना आरक्षण व गुणानुक्रमे नेमणुका देणेत येतील (परिक्षा उत्तिर्ण कालावधी विचारात घेतला जाईल) रिक्त जागांकरीता प्राप्त

१०) अर्जाचा विचार केला जाईल, प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांमधुन रिक्त जागा, आरक्षण व गुणानुक्रमे नेमणुका केल्या जातील. तसेच उमेदवारानी केलेले रजिस्ट्रेशन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांनी पात्र न ठरविल्यास देण्यात आलेली नेमणूक रद्द केली जाईल. उपस्थित उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा खर्च दिला जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

११) सदरच्या नेमणुका ह्या फक्त शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ नुसार विहित केलेल्या प्रशिक्षण कालावधीसाठी शासनाकडील/कामगारकल्याण यांचेकडील किमान वेतन दरानुसार विद्यावेतनावर केल्या जाणार आहेत. प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर नेमणुक संपुष्टात येणार आहे. अशा उमेदवारांचा महापालिकेतील कोणत्याही पदांवर हक्क राहणार नाही.

१२) जाहिरातीच्या अनुषंगाने अधिकृत अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरुन Download करुन घेता येईल.

सहाय्यक आयुक्त,प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

क्रमांक – प्रशा/११/कावि/ ९९२/२०१७.

दिनांक – १६/११/२०१७.

# शिकाऊ उमेदवारीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,

मा.सहा.आयुक्त, प्रशासन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

विषय :- अधिनियम-१९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवार नेमणूकबाबत.

महोदय,

शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवार नेमणूकीसाठी मनपा वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या जाहिरात प्रकटनानुसार ____________________ या व्यवसायासाठी शिकाऊ उमेदवार नेमणूकीस आवश्यक ती अर्हता मी धारण करीत असून रिक्त जागेवर निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनांव    स्वत:चे नाव    वडील / पतीचे नाव

१) संपूर्ण नांव :- ________________________________

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ____________________________

३) जन्मतारीख :-

४) जात :-    प्रवर्ग-

५) रजिस्ट्रेशन क्र.

६) **Email ID:**

७) आधारकार्ड क्रमांक :

८) मोबाईल क्र.

९) प्रवर्गातील चौकटीत ✓ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

१०) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या तपशिल :-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

वरील क्र.१ ते १० मध्ये नमूद केलेली माहिती/तपशिल सत्य व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत सादर करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, दिलेली माहिती खोटी/चुकीची आढळून आल्यास सदर माहितीच्या आधारे माझी केलेली नेमणूक रद्द करण्यास व कायदेशीर कारवाईस मी पात्र असणार आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

(नांव-    )

दिनांक :-

सहपत्रे -१)    २)

३)    ४)